महाराष्ट्र शासन
## सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी-विंग, नासर्डी पुलाजवळ,नाशिक-पुणे रोड,नाशिक-४२२०११
ई-मेल acswonashik@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२५३-२९७५८००

जा.क्र.सआसकना/ भासशि/डीबीटी/२१४०/२०२६-२७ नाशिक, 2940 दिनांक ०७/०७/२०२६

**परिपत्रक** ई-मेल व्दारे

प्रति,
प्राचार्य (सर्व),
कनिष्ठ/ वरिष्ठ/ व्यवसायिक महाविद्यालये, जिल्हा नाशिक.

**विषय :-** व्यावसायिक अभ्यासक्रम (वैदयकीय/इंजिनियरिंग) प्रवेशासाठी प्रयत्न करणाऱ्या विदयार्थ्यांनी पर्यायी प्रवेश घेतलेल्या सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (BA/BSc/Diploma इ.) शिष्यवृत्ती अर्जांबाबत.

**संदर्भः-** मा.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.२३४६ दि.३०.०६.२०२६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, काही विदयार्थी तात्पुरत्या घेतलेल्या इ.११ वी किंवा सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती/ फ्रीशीप चा अर्ज भरतात आणि शिष्यवृत्तीचा लाभ त्या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर होतो. परंतु काही कालावधीनंतर जेव्हा या विदयार्थ्यांची निवड व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी होते, तेव्हा महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक तरतुदीनुसार व संबंधित शासन निर्णयातील विहीत केलेल्या निकषांनुसार एखादया अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन त्याकरिताच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन सादर अभ्यासक्रम अर्धवट सोडुन कोणत्याही अभ्यासक्रमास नव्याने प्रवेश घेतला तरी अशा विदयार्थ्यांचा नव्याने घेतलेल्या अभ्यासक्रमाकरीता शिष्यवृत्तीचा अर्ज अपात्र होऊन त्यास त्यावर्षाकरीता कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही.

त्याकरीता विदयार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान रोखण्याकरीता आपल्या महाविदयामार्फत खालील सूचना निर्गमित कराव्यात-

**१.विदयार्थ्यांचे समुपदेशन-** महाविदयालयात प्रवेश घेणाऱ्या अशा विदयार्थ्यांचे प्रवेशाच्या वेळीच समुपदेशन करण्यात यावे, जेणेकरुन ते अनावधानाने गॅप वर्षांमधील प्रवेशित सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता शिष्यवृत्ती अर्ज करणार नाहीत.

**२.व्यापक प्रसिध्दी-** याबाबत विदयार्थ्यांसाठीचा 'माहिती पत्रक व जाहीर आवाहन' महाविदयालयाच्या मुख्य फलकावर, डिजिटल ग्रुप्सवर व शिष्यवृत्ती विभागाबाहेर ठळकपणे प्रसिध्द करावा.

**३.प्रवेश अर्ज पडताळणी-** १. विदयार्थ्यांनी जर काही कालावधीनंतर त्याच शैक्षणिक वर्षात किंवा पुढील वर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमास जाण्याचा मानस व्यक्त केला असेल तर त्यांना चालू वर्षांमधील प्रवेशित सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता शिष्यवृत्तीचा पर्याय न अवलंबण्याचे मार्गदर्शन महाविदयालयाच्या शिष्यवृत्ती विभागातर्फे देण्यात यावे. मात्र अशा स्थितीत विदयार्थ्याने सदर अभ्यासक्रमाकरीता विहीत केलेले शैक्षणिक शुल्क भरणे क्रमप्राप्त राहतील. याबाबतच्या स्पष्ट लेखी सूचना महाविदयालयाने त्यांच्या महाविदयालयात प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या विदयार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी देण्यात याव्यात.

२. तसेच शिष्यवृत्तीची रक्कम ही डीबीटी तत्वावर राज्यशासन व केंद्रशासन स्तरावरुन थेट विदयार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत असल्याने अशी डीबीटी तत्वावर अदा झालेली रक्कम शासनास चलनाव्दारे परत करावयाचे कोणतेही वित्तीय नियम प्रचलित नाहीत, याबाबतच्या स्पष्ट लेखी सूचना महाविदयालयाने त्यांच्या महाविदयालयात प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या विदयार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी देण्यात याव्यात.

तरी आपल्या महाविदयालयातील प्रवेशित पात्र विदयार्थ्यांचे भविष्यात शिष्यवृत्ती/ फ्रीशीप अभावी व्यावसायिक शिक्षणाचे नुकसान होणार नाही याची गांभीर्याने नोंद घेऊन, सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत- संदर्भिय पत्र.

(देविदास नांदगांवकर)
**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**
**नाशिक**

**प्रत- माहितीस्तव सविनय सादर.**

**१.मा.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे .**
**२.मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नाशिक.**

(देविदास नांदगांवकर)
**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**
**नाशिक**